Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- VIII | ISSUE- IX | SEPTEMBER | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x

# हिंदू कोडबील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्रा. डॉ. रमेश रणदिवे,
ranadiveramesh1@gmail.com
राज्यशास्त्र विभागप्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंध, पुणे.

भारतीय समाज व्यवस्थेतील सर्व प्रकारच्या विषमते पैकी एक म्हणजे स्त्री-पुरुष विषमता होय. परिणामी उच्चवर्णीय स्त्रियांपासून तळागाळातील स्त्रियापर्यंत सर्व स्त्रिया परंपरागत व्यवस्थेमुळे शोषित व पिडीत आहेत. या सर्वांच्या मुक्तीचा उपाय म्हणजे "कायदा" होय हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदर्शी बुद्धीला पटले कारण ज्या मार्गाने ही विषमता व परावलंबित्व आले त्याच मार्गाने त्या विषमतेचे परिमार्जन केले पाहिजे. असे ठाम पणे ठरवून त्यांनी स्त्रियांच्या उत्थानासाठी कायद्याची गरज आहे हे जाणले.

१५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरा कायदा मंत्री झाले. भारतीय राज्यघटनेचे मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी महत्त्वाचे काम केले. राज्य घटनेची बांधणी समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुता या चार मूलतत्वावर झालेली आहे. पहिले तत्व समता, जी भारतीय जीवनात कधीच नव्हती. हजारो वर्षे विषमतेची परंपरा चालत आलेली होती. व भारताच्या रक्तकणात आत्मसात झालेली होती. त्यामुळे समतेवर आधारित स्वातंत्र्याची आशा करणे व्यर्थच होते. धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान इत्यादीमुळे व्यक्तीचे होणारे मूल्यमापन अधिकाधिक जाचक होते. यामुळे हा जाच कायद्यानेच नष्ट करण्याची गरज होती. आणि कायदा सर्वांनाच सारखा लागू होईल हे सांगणे आवश्यक होते म्हणून संविधानाच्या १४ व्या कलमात कोणत्याही भारतीय व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्या पुढे समानता किंवा कायद्या पुढे समान संरक्षण नाकारता येणार नाही.

कलम १४-१ राज्य केवळ धर्म, जात, वंश, लिंग व जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल असा भेदभाव करणार नाही. कलम १४-२ सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळणे १५-३ कलमात स्त्रिया व बालके यांच्या करिता विशेष तरतुदीचा उल्लेख आहे. कलम १६-१ व २ सेवायोजन, पद्नियुक्ती, नोकरी इत्यादी धर्म, जात, वंश, लिंग, कुल जन्मस्थान व निवास इत्यादी कारणावरून भेदभाव केला जाणार नाही. व सर्व नागरिकांना समान संधी मिळेल या कलमांचा महिलांच्या जीवनावर काय परिणाम झाला हे पाहणे जरुरीचे आहे. लिंगभेदा मुळे स्त्रियांवर घोर अत्याचार झालेले होते आणि आजही वास्तवात होत आहेत. कारण परंपरा आजही प्रभावी आहे. पण आज स्त्री- मुक्ती संघटना ह्या अत्याचारा विरुद्ध लढत आहेत. विशेषतः स्त्रियांनी ही बाजू खंबीरपणे सांभाळल्या मुळे काही प्रमाणात का होईना चित्र बरेच पालटले आहे. स्त्री- मुक्ती बरोबरच स्त्री वादाचा आग्रह महिला संघटनानी धरलेला दिसतो. त्यामुळे स्त्री हक्काची भूमिका अर्थातच आग्रही ठरते.

परंपरागत कायद्यांनी जखडलेली स्त्री ज्यांना चूल व मुले या पर्यंतच मर्यादित ठेवले होते. डॉ. बाबासाहेबांच्या संविधानात नमूद केलेल्या समतेचे आधारावर विकासाची संधी मिळाल्या बरोबरच शिक्षणातच नव्हे तर अर्थार्जन सेवायोजनेतील संधीमुळे तसेच नोकरी मुळे मिळालेल्या स्वावलंबनामुळे सक्षम होऊन सशक्ती करणाची वाट चालू लागल्याचे दिसून येते. आर्थिक धोरण राबविण्याबाबत ३९ व्या कलम नुसार उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळण्याचा अधिकार स्त्री-पुरुषांना समान राहील. तसेच स्त्री पुरुषांचे वेतन समान राहील. यामुळे स्त्रियांना एक बळकट आधार मिळाला. आज भारतात सर्वच क्षेत्रात आय.ए.एस., वकील, न्यायाधीश, इंजिनिअर, डॉक्टर, बिझनेस, एवढेच नव्हे तर संरक्षण दलात म्हणजे पुरुषी कर्तुत्वाच्या जागांवर आपले कर्तुत्व स्त्रियांनी सिद्ध केलेले आहे. फार-फार तर नर्सेस किंवा शिक्षिका पर्यंत स्त्रिया मजल मारतील असे समजणाऱ्याना यामुळे स्त्रियांनी चांगला धडा शिकविला आहे. असे म्हणणे वावगे ठरणार नाही. स्त्रियांची पुनर्निर्मितीची क्षमता व प्रकृती लक्षात घेऊन ४२ व्या कलमात स्त्रियासाठी प्रसूती सहाय्याची तरतूद केलेली आहे. या एका गोष्टीचा उल्लेख करण्याची गरज वाटते. कुटुंब नियोजनाच्या बाबतीत बाबासाहेबांनी स्त्रियांचे आरोग्य व कुटुंबाचे योग्य नियोजन स्त्रियांशीच संबंधीत आहे. अशी स्पष्ट भूमिका घेतल्याचे दिसते.

**हिंदू कोडबील :-**

संपूर्ण सम्यक क्रांतीच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग सक्रीय असल्या शिवाय ती यशस्वी होऊ शकणार नाही. हे जाणून त्यांच्या प्रगतीची वाट मोकळी करण्यासाठी तत्कालीन कायदे मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाच्या संहिते करता सात कायदे एकत्र समाविष्ट केले व या विधेयकाचा प्रस्ताव मांडला. एवढे महत्त्वाचे विधेयक सत्राच्या अगदी शेवटी चर्चेसाठी सदना समोर यावे या विषयी दु:ख व्यक्त करून पुढे म्हणाले महोदय, हे विधेयक सात मिश्र बाबींशी संबंधीत कायद्याचे संहीतीकरण करू पहाते. सर्व प्रथम हे विधेयक अशा मृत हिंदू व्यक्तींच्या म्हणजे स्त्री व पुरुष दोघांच्याही मालमत्तेच्या हक्कांशी संबधीत नियमांचे

संहीतीकरण करू इच्छीते, जी व्यक्ती इच्छा पत्र न करता मेलेली असते दुसरे म्हणजे भिन्न-भिन्न वारसदरामध्ये वारसांच्या क्रमांच्या स्वरुपात विहित करते. या विधेयकाद्वारे हाताळले गेलेले पुढचे विषय म्हणजे पोटगी, विवाह, घटस्फोट, दत्तक विधान अज्ञानकत्व व पालकत्व यांचे संबधित कायदे वरील सातही विषय स्त्रियांच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहेत हे वेगळे सांगावयास नको बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व प्रथम वारशाचा प्रश्न घेतला त्या संबधात मृत व्यक्तीची विधवा त्याची मुलगी व पूर्वी मृत झालेल्या त्याच्या मुलाची विधवा यांना वारश्याच्या बाबतीत मुलाच्या बरोबरीची श्रेणी देण्यात यावी. त्याच्या जोडीला मुलीलाही वडिलांच्या मालमत्तेत मुलाच्या अर्धा हिस्सा देण्यात आला. जुन्या कायद्यात स्त्री वारसदरांमध्ये त्याची आर्थिक परिस्थिती वैवाहिक दर्जा अशा कारणावरून भेद-भाव केला जात असे. स्त्रिया-स्त्रियामध्येच भेद-भाव करणारे वरील सर्व मुद्दे नव्या विधेयकात काढून टाकण्यात आले. ती स्त्री एकदा वारसदार म्हणून घोषित झाली आहे. या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही गोष्टी विचारात घेण्याची गरज नाही. असे डॉ. आंबेडकर म्हणतात. तसेच आईच्या तुलनेत वडील आधी उत्तराधिकारी ठरत. या विधेयकात आईला वडिलांच्या आधी उत्तराधिकारी बनवले.

या विधेयकाने स्त्री धनाचे अनेक प्रकार काढून टाकून सर्व स्त्री धन एकच आहे व त्याला वारशाचा नियमही एकच लागतो अशी तरतूद केली. स्त्री धनाच्या बाबतीत मुलीच्या हिश्याचा आर्धा हिस्सा वारशाने मुलालाही मिळावा ही तरतूद करून बाबासाहेबांनी वडिलांच्या मालमत्तेत जसा मुलीला मुलाच्या अर्धा हिस्सा मिळतो तसा आईच्या मालमत्तेत मुलालाही मुलीच्या अर्धा वाटा दिला.

"हे विधेयक मुलगा व मुलगी यांच्या सामाजिक दर्जा मध्ये समानता राखण्यासाठी प्रयत्न करते." असे उद्गार त्यांनी या प्रसंगी काढले आहेत.

या खेरीज धार्मिक संस्कारयुक्त विवाह व नोंदणी विवाह घटस्फोट, दत्तक विधान संबंधात स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून बाबासाहेबांनी नव्या तरतुदी केल्या हुंड्याच्या बाबतीत, विवाहात मुलीने माहेरून हुंड्याच्या स्वरुपात आणलेली संपत्ती मुलीची मालमत्ता मानली जाईल तिचा उपयोग त्या स्त्रीच्या कामी येईल. आणि १८ वर्षानंतर त्या मालमत्तेवरील हक्कास ती पात्र होईल. ती संपत्ती तिच्या पतीला किंवा त्याच्या नातेवाईकांना उडविता येणार अशी तरतूद केली.

आणखी एक महत्त्वाचा बदल बाबासाहेबांनी केला तो म्हणजे स्त्रियांच्या मर्यादित इस्टेटीचे अबाधित इस्टेटीमध्ये रुपांतर या शिवाय विवाह व दत्तक विधानातून जातीचे उच्चाटन, एक पत्नीकत्व, विवाहातून बाहेर पडण्यासाठी घटस्फोट तत्व यांची तरतूद विधेयकात करून स्त्रियांना फार मोठा दिलासा दिला.

हिंदू कोडबील बाबासाहेबांच्या जीवनाचे ध्येय होते. १९४७ पासून सतत चार वर्ष एक महिना सव्वीस दिवस त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांचे अंतिम उद्दिष्ट स्त्रियांना हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त व्हावी हेच होते. परंतु एवढ्या कष्टाने स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामा असलेले हे हिंदूसंहिता विधेयक मंजूर होऊ शकले नाही. त्यातील घटस्फोट द्विभार्या प्रतिबंधक यासारखी कलमे विरोधकाकडून विवाद्य बनविण्यात आली. बिलाच्या विरोधकांना बाबासाहेबांनी २० सप्टेंबर १९५१ रोजी अत्यंत जोरदार मार्मिक उत्तर दिले.

आज सुधारणेच्या युगात स्त्रियांना समान हक्क द्यायला तुम्ही विरोध का करता ? स्त्रियांना मालमत्तेत वाटा देण्यास मनुनेही नकार दिला नाही. मग तुम्ही का देता ? असा सवाल त्यांनी सनातन्यांना केला. एकटे डॉ. बाबासाहेब आंबेडकर लढत राहिले. पण सत्र संपले तेव्हा हिंदू कोड बिलाची फक्त चार कलमे मंजूर झाली. त्यामुळे अत्यंत दुखी व निराश होऊन डॉ. बाबासाहेबांनी आपल्या कायदा मंत्री पदाचा २७ सप्टेंबर १९५१ रोजी राजीनामा दिला. केवढा प्रचंड त्याग बाबासाहेबांनी स्त्रियांसाठी केला. पुढे १९५२ नंतर केंद्र सरकारने बाबासाहेबांच्या मसुद्यात ४ स्वतंत्र कायदे बनविले ते म्हणजे १) दि-हिंदू विवाह कायदा – १९५५ २) दि हिंदू सक्सेसन कायदा – जून १९५६ ३) दि-हिंदू अल्पसंख्याक कायदा गार्डियनशिप कायदा ऑगस्ट १९५६ ४) दि-हिंदू ऑडॉप्शन कायदा मेंटेनन्स कायदा डिसेंबर १९५६.

स्त्रियांच्या हिताच्या दृष्टीने बाबासाहेबांनी अलौकिक कार्य केले. या कार्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिलाचा आग्रह धरला. दलित समाजाचा नेता हिंदू स्त्रियांच्या हक्कांसाठी निर्धाराने उभा राहिला. भारतीय स्त्री स्वातंत्र्याचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा राजाराम मोहन रॉय, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या बरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव सुवर्णाक्षराने लिहिले जाईल. आज भारतात स्त्रीमुक्तीचळवळ जोमाने सुरु आहे. स्त्रिया स्वताचा मुक्तीचा मार्ग चोखाळत असताना बाबासाहेबांनी केलेल्या कायद्याची शिदोरी घेऊनच पुढची वाटचाल करतात. स्त्री मुक्तीतून स्त्री वादाकडे नेण्यात हे कायदे तितकीच महत्त्वाची भूमिका निभावतात आणि म्हणूनच स्त्रियांच्या सबलीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कर्तुत्व लोकोत्तर आहे.

**संदर्भसूची**

१) Ambedkar: Writings and Speeches
२) Keer, Dhananjay, Dr. Ambedkar: Life and Mission 1954
३) लोकराज्य महाराष्ट्र शासन २०१५.
४) डॉ. आंबेडकर बाबासाहेब, हिंदू कोड बिल, विनिमय पब्लिकेशन्स
५) कीर, धनंजय, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर: मानस आणि तत्वविचार.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

99

VOL- IX ISSUE- V MAY 2022 PEER REVIEW e-JOURNAL
Aayushi International Interdisciplinary R[...]

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मांतराच[...]

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

**प्रस्तावना :**

ब्रिटिशांनी भारतीयांना आधुनिकतेच्या वाटेवर आणले. त्यांच्यामुळे भारतात सामाजिक सुधारणांचा प्रारंभ झाला. भारतातील समाजसुधारणेची सुरवात धर्मसुधारणेच्या चळवळीतून झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थीदशेत असताना कृष्णाजी केळुसकर गुरुजींनी त्यांना सत्काराच्या वेळी 'बुद्धचरित्र' भेट दिले होते. तेव्हापासून बुद्ध हा त्यांचा आकर्षणाचा भाग बनला.

धर्मांतराचा परिणाम भारतातील अस्पृश्य समाजाबरोबरच स्पृश्य समाजावरही पडला. या धर्मांतराची दखल जगातील बौद्ध राष्ट्रांनी घेतली, तसेच भारतातील हिंदु धर्मियांनाही घ्यावी लागली. धर्मांतर हे कुणा एका व्यक्ती, समूहाच्या विरोधात नसून विषमता निर्मुलन आणि जातिअंताच्या लढ्यातील हे निर्णायक पाऊल होते. त्यामुळे जातीनिर्मुलनाचे तीन प्रमुख मार्ग आहेत, त्यापैकी धर्मांतर हा महत्त्वाचा मार्ग आहे. धर्मचिकित्सा सुधारणा, आंतरजातीय विवाह हे दोन प्रभावी मार्ग आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्मांतराकडे केवळ धार्मिक बाब म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची एक महत्त्वाची रणनीती म्हणून पाहात होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या चळवळीला भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. डॉ. आंबेडकरानी आपल्या लाखो अनुयायांच्या समवेत नागपूर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी धर्मांतर केले. त्यांनी हिंदु धर्मातून बौद्ध धर्मात प्रवेश केला. आधुनिक भारताच्या इतिहासात इतक्या मोठ्या समुहाने केलेले हे सर्वात मोठे धर्मांतर होय. त्यानंतर थोड्याच दिवसात त्यांचे महानिर्वाण झाले. त्यानंतर त्यांचे अनुयायी खेडोपाडी धर्मांतराचा कार्यक्रम राबवीत आहेत.

**धर्मांतराची पार्श्वभूमी**

डॉ. बाबासाहेब आ[...] जीवनास प्रारंभ केला. जातीव्यवस्थेच्या आणि स्त्रिय[...] उभे राहिले. डॉ. बाबासाहेब आंब[...] पर्यंत हिंदू धर्मांतर्गत सुधारणा व[...] १९३५ नंतर त्यांनी सुधारणाऐव[...] उचलायला सुरवात केली. त्यांनी [...] जिल्ह्यातील येवले येथे परिषद बोलवि[...] नाशिक येथील आंदोलनात अस्पृश्य[...] सवर्णाकडून मिळालेले असहकार्य किंवा [...] सहकाऱ्यामुळे डॉ. आंबेडकर अस्वस्थ होते. अस्पृश्यांनी हिंदू धर्माचा त्याग करावा आणि धार्मिक समता ज्या धर्मात असतील तो धर्म स्वीक[...] ठराव परिषदेत मांडला होता.

दि. १३ ऑक्टोबर १९३५ रोजीच्या येवला परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी 'मी हिंदू [...] जन्माला आलो असलो, तरी मी हिंदू म्हणून मरणार ना[...] अशी क्रांतिकारक घोषणा केली. पण कोणता ध[...] स्वीकारणार, केव्हा स्वीकारणार, याबद्दल काहीही स्पष्ट केलेले नाही. हिंदू धर्मात अस्पृश्यता आहे, जातीव्यवस्था आहे, स्त्रियांना अवमानित केले जाते, त्यामुळेच यावर धर्मांतर हा एकमेव मार्ग आहे, अशी त्यांची ठाम भूमिका होती.

डॉ. बाबासाहेब आंबेकरपूर्व नेते गोपाल बाबा वलंगकर 'विटाळ विध्वसंक' या ग्रंथाच्या माध्यमातून धर्मचिकित्सा करून काही प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुल्यांनी त्यांना दिशा दिली होती. त्या क्रमवारीत आंबेडकरांची धर्मांतराची कृती ही पुढचं पाऊल ठरणारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा या धर्मांतराच्या घोषणेचा व्यापक परिणाम भारतीय समाजव्यवस्थेवर- विशेषत: अस्पृश्य, कॉंग्रेस आणि हिंदू सुधारक यांच्यावर झाला. हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेतील शुद्र हे अस[...]

ISSN 2349-638X www.aiirjournal.com
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67

गणले जात होते. त्यांचे मानवी हक्क हिंदू धर्माने नाकारले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीने आत्मविश्वास निर्माण केल्यामुळे त्यांच्यात मोठा उत्साह निर्माण झाला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या धर्मांतराच्या घोषणेचा परिणाम अस्पृश्य, मागासलेल्या जाती, तसेच स्पृश्य समाजावरही झाला. विशेषतः कॉंग्रेस नेते महात्मा गांधी आणि हिंदू धर्मातील सुधारकांवर धर्मांतराच्या घोषणेचा परिणाम झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घोषणेची दखल महात्मा गांधीनी घेतली आणि कॉंग्रेस अंतर्गत अस्पृश्य निर्मुलन कार्यक्रमाला प्राधान्य दिले. धर्मांतराचा परिणाम हिंदू समाजसुधारकांवर व्यापक स्वरुपात झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले तर त्याचा परिणाम हिंदूधर्मियांवर होईल, म्हणून अनेकांकडून आंबेकरांचे मन वळविण्याचा प्रयत्न झाला. १९३५ मध्ये पुण्यात हिंदू महासभेचे अधिवेशन झाले. हिंदू महासभा हि त्या काळात हिंदूची एक मुख्य संघटना म्हणून मानली गेली होती. या अधिवेशनात हरिजनांनी हिंदू धर्माचा त्याग करू नये, तसे झाले तर आम्ही त्यांची पायधूळ कपाळाला लावू, अशी भूमिका मांडली आहे. या अधिवेशनात जन्म आणि जातीवरून हिंदुनी सार्वजनिक व राजकीय जीवनात भेदभाव करू नये, असा ठराव समंत करण्यात आला. हिंदू महासभेच्या धोरणात बदल झाला, हा आंबेडकरांच्या घोषणेचा खूप मोठा परिणाम आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेपासून ते प्रत्यक्ष धर्मांतर होईपर्यंत त्यांनी सर्व धर्मांचा सविस्तर आणि सखोल अभ्यास केला. त्यासाठी काही गट तयार केले होते. विचारांती त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला.

***धर्मांतर प्रक्रिया :***

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर मुक्कामी धर्मांतर करताना त्रिशरण, पंचशील ग्रहण करून हिंदू धर्माला नकार आणि बौद्ध धर्माचा स्वीकार करणाऱ्या आपल्या अनुयायांकडून बावीस प्रतिज्ञा वदवून घेतल्या. या प्रतिज्ञा त्यांनी स्वतः तयार केल्या होत्या. त्याच दिवशी संध्याकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकार परिषद घेतली. त्यात भगवान बुद्धांनी जी धर्मतत्वे उपदेश केली आहेत, तीच मी पळणार आहे. हीनयान आणि महायान या बौद्ध धर्मातील पंथामुळे जे मतभेद झाले, त्यापासून मी माझ्या लोकांना अलिप्त ठेवणार आहे. माझा धर्म म्हणजे एक प्रकारचा नवबौद्ध किंवा नवयान आहे. म्हणजेच तो आंबेडकरी बौद्ध धम्म होय. आपली भूमिका अधिक स्पष्ट व्हावी म्हणून डॉ. आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ त्यांच्या मृत्युनंतर प्रकाशित झाला. या ग्रंथाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी भारतातील धर्मांतरीत बौद्ध धर्माला दिशा मिळवून दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथे धर्मांतर घडविल्यानंतर त्यांचे अनुयायी गावोगावी धर्मांतराचे कार्यक्रम राबवत गेले आणि धम्म परिषदा घेऊन त्यांनी धर्मांतराची चळवळ पुढे नेली. डॉ. आंबेडकरांकडून प्रेरणा घेऊन जगण्याच्या संघर्षाला विधायक दिशा दिल्याने महाराष्ट्रातील अस्पृश्य समाजाचा विकास वेगाने होत आहे. हा विकास रोखण्यासाठी अथवा त्यात अडथळा निर्माण करण्यासाठी विषमतावादी लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे प्रयत्न करीत होते आणि आजही करताना दिसतात. त्याचाच एक भाग म्हणजे धर्मांतरीत बौद्धांना सवलती नाकारण्याचे राजकारण पुढे आले. धर्मांतरीत बौद्धांना केंद्रातील सवलती पासून वंचित ठेवण्यात आले. बौद्ध पुढाऱ्याच्या मागणीवरून राज्यात नवबौद्धांचा समावेश सवलतीच्या यादीत करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ सालापासून जातीअंताचा एक भाग म्हणून धर्मांतराकडे पहिले होते. त्यात बौद्ध धर्म हा समतेवर आणि मानवी हक्काची जोपासना करणारा असल्याने, हा बौद्ध धर्म स्वीकारण्याचे निश्चित केल्यानंतर आपल्या आयुष्याचे एक महत्वाचे मिशन ठरविले होते.

***बौद्ध-बौद्धेत्तर :***

सन १९५६ च्या धर्मांतराचा परिणाम महाराष्ट्रात हिंदू धर्मावर मोठ्या प्रमाणवर झाला. बौद्धांनी पूर्वाश्रमीचा हिंदू धर्म, त्यांच्या देवदेवता, संस्कृती नाकारल्यामुळे, तसेच चळवळीच्या प्रभावाने त्यांच्यात मोठे सांस्कृतिक बदल घडून आले. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात आक्रमकता होती. या आकर्षकतेने आणि हिंदू धर्माच्या टीकेमुळे बौद्ध-बौद्धेतरात अंतर पडत गेले. प्रस्थापितांकडून बौद्धना एकाकी पाडण्यात आले. जाणीवपूर्वक बौद्धेतर मागास समाजाला त्यांच्या विरोधात उभे केले. त्यामुळे सर्व मागास समूह शोषणाविरुद्ध एकत्र येऊन लढू नये यासाठी, तसेच त्यांच्यात फुट पडण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक करण्यात आला.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

***धर्मांतर आणि इतर मागास जाती :***

१९८० नंतर भारतभरातील ओबीसी जागृतीच्या चळवळीला प्रारंभ झाला. १९९० च्या दशकात महाराष्ट्रात अनुसूचित जाती-अनुसूचित जमाती-ओबीसी समुदायाचे नेते सामाजिक-सांस्कृतिक स्तरावर परिवर्तनाचे कार्य करीत होते. त्यातूनच इतर मागासवर्गीय नेत्यांनी बौद्ध धर्मात प्रवेश केला. त्यात हनुमंत हुपरे, लक्ष्मण माने यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करून इतर मागासवर्गीयांचे, भटक्या विमुक्तांचे धर्मांतर घडवून आणले. २००६ साली काशीराम यांनी चर्मकार लोकांना घेऊन धर्मांतर करण्याची घोषणा केली होती.

भारताच्या सामाजिक सांस्कृकतेवर धर्मांतराचा व्यापक परिणाम झाला. नव्याने स्वीकारलेल्या बौद्ध धम्माचा प्रचार करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी धर्मांतरपूर्वीच ४ मे १९५५ रोजी दिल्ली येथे भारतीय बौद्ध महासभा स्थापन करून धर्मांतराची चळवळ व्यापक करण्याचा पाया घातला.

**निष्कर्ष :**

भारतीय बौद्ध महासंघाचे अध्यक्ष प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांच्या महानिर्वाणानंतर यशवंतराव तथा भैय्यासाहेब आंबेडकर अध्यक्षपदी राहिले. त्यांच्या मृत्यूनंतर मीरा आंबेडकर अध्यक्षपदी राहिले. महाराष्ट्रात आणि देशाच्या भागात बौद्ध महासंघ कार्यरत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथील धर्मांतराच्या वेळी दिलेल्या २२ प्रतिज्ञेची कठोर अमलबजावणी, बौद्ध धर्माचा विचार-प्रसार यावर संघटनानी भर दिला. धर्मांतराच्या चळवळीमुळे भारतीय समाजाला नवा सांस्कृतिक पर्याय मिळाला आहे. विशेषतः अस्पृश्य, दलित, भटके-विमुक्त जातीजमाती ओबीसींनी याकडे जातीअंताचे साधन म्हणून पहिले.

**संदर्भसूची :**

१) फडके, भालचंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८५.
२) फडके, य.दि., आंबेडकरी चळवळ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९०.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग्ज अँड स्पीचेस महाराष्ट्र शासन.
४) डॉ. आंबेडकर बी.आर., बुद्ध व कार्ल मार्क्स, सुगावा प्रकाशन, पुणे १९५६.
५) किर, धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६६.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67.